www.rajdand.com
पुणे, गुरुवार
23.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । फाल्गुन शु.४
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



गौतम अदानींना तिसरा मोठा झटका! ओरिएंट सिमेंटची आणखी एक मोठी डील हातातून निसटली

पान ४ वर..

# निवडणूक आयोगाच्या निकालाला स्थगिती नाही

## ठाकरे गटाच्या आमदारांना 'व्हीप' जारी न करण्याची घेतली हमी

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**'शिवसेना' हे नाव आणि धनुष्यबाणाचे चिन्ह शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. मात्र, ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवरील पुढील सुनावणी पर्यंत ठाकरे गटाच्या आमदारांना वीप जारी न करण्याची हमी न्यायालयाने शिंदे गटाकडून घेतली आहे.**



निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देत उद्धव ठाकरे गटाने त्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. शिवसेना म्हणून निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या शिंदे गटाकडून सर्व आमदारांना वीप जारी केला गेल्यास त्याचे पालन न करणारे ठाकरे गटाचे आमदार अपात्र ठरतील. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशी विनंती ठाकरे गटाकडून करण्यात आली. ही विनंती अमान्य करतानाच न्यायालयाने ठाकरे गटाच्या आमदारांना दोन आठवड्याचे संरक्षण दिले आहे. ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेची पुढील सुनावणी दोन आठवड्यानंतर केली जाणार आहे.

या याचिकेच्या सुनावणी दरम्यान दोन्हीकडच्या वकिलांनी ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल तर शिंदे गटाकडून किशन कौल यांनी जोरदार युक्तिवाद केले.

निवडणूक आयोगाने निर्णय घेताना केवळ ४० आमदारांचा कौल मान्य केला. मात्र, केवळ विधिमंडळ पक्ष म्हणजे संपूर्ण पक्ष नव्हे. राज्यसभेत ठाकरे गटातील खासदारांची संख्याच अधिक आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्ते ठाकरे गटाकडेच आहेत, असा दावा सिब्बल यांनी केला.

तर निवडणूक आयोग कोणताही निर्णय घेताना निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेत असतो. त्याला आक्षेप घेण्याचे काही कारण नाही. तसेच संघटनात्मक पातळीवर पाठिंबा दर्शविण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रांवर हरकत घेण्याचेही काही कारण नाही, असे कौल यांनी नमूद केले.

# मंगळवेढ्यात एकाच घरातील तीन महिलांची दगडाने ठेचून निर्घृण हत्या

## एका संशयिताला अटक

**पंढरपूर : प्रतिनिधी**

**मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर येथे एकाच घरातील तीन महिलांची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या तिहेरी हत्याकांडाच्या घटनेनंतर या परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे. या हत्येप्रकरणी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे.**



नंदेश्वर येथील हॉटेल व्यावसायिक महादेव माळी यांच्या दोन बहिणी आणि सुनेची अज्ञात कारणाने दगडाने ठेचून हत्या झाल्याचे समोर आले आहे . महादेव माळी यांच्या मातोश्रीचे निधन काही दिवसापूर्वी झाले होते. यासाठी माळी यांच्या दोन विवाहित बहिणी शेतातील वस्तीवर राहण्यासाठी आल्या होत्या. दरम्यान महादेव माळी हे गावातील हॉटेलकडे तर त्यांचा मुलगा बंडू हा त्याच्या कापड दुकानाकडे गेल्यावर दुपारी हा धक्कादायक प्रकार घडल्याचे सांगितलं जात आहे.

दुपारी १२ ते २ च्या दरम्यान मृतातील एक महिला बाहेर कपडे धुवत असताना तिच्यावर या अज्ञाताने दगडाने हल्ला केल्याचे सांगितले जातंय. नंतर दुसरी बहीण आणि सून पळून जात असताना त्यांच्यावरही हल्ला करून हत्या केल्याचं सांगितलं जातं. सुदैवाने या सुनेची चार महिन्याची मुलगी घरातच होती. मात्र या नराधमाला तिची माहिती नसल्याने ती यातून वाचली.

इतक्या क्रूरपणे झालेल्या या हत्याकांडामुळे हा परिसर हादरून गेला आहे. या घटनेची माहिती मिळताच मंगळवेढा येथील पोलिस उपाधीक्षक राजश्री पाटील,अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक माने घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरु केला आहे. या प्रकरणात शेजारीच राहणाऱ्या एका तरुणाला संशयित म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे अधिकच तपास सुरु केला आहे. याबाबत अजून पोलिसांकडून कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी यातील संशयित आरोपीपर्यंत पोलिस पोहोचल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे.

# महिंद्रा पिकअप घेण्यासाठी माहेरून पैसे आणण्यासाठी नवऱ्याकडून तगादा; विवाहितेची आत्महत्या

## विहिरीत उडी मारून संपवले जीवन; पंढरपूर तालुक्यातील उपरी येथे घडली घटना

**पंढरपूर : प्रतिनिधी**



महिंद्रा पिकअप घेण्यासाठी माहेरून पैसे घेउन ये, असा तगादा नवऱ्याने लावल्याने विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील उपरी येथे घडली आहे.

पंढरपूर तालुक्यातील उपरी येथील शीतल नवनाथ नागणे राहणार नागणे वस्ती उपरी तालुका पंढरपूर या विवाहितेचा मृतदेह विहरीत आढळून आला होता. या प्रकरणी मयत शीतल यांचे भाऊ गणेश प्रल्हाद आसबे राहणार खरसोळी तालुका पंढरपूर यांनी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादी नुसार मयत शीतल यांचे लग्न उपरी येथील नवनाथ नागणे यांच्या समवेत ५१ हजार रुपये हुंडा व अडीच तोळे देत १५ एप्रिल २०१२ रोजी झाले होते. लग्नानंतर मयत शीतल यांचा मागील ३ वर्षांपासून पती नवनाथ हा तिचे सासू सासरे यांच्या सांगण्यावरून मारहाण करीत छळ करीत होता.पती नवनाथ याने दोन तोळे सोन्याचा आहेर पाहिजे, असा तगादा लावला होता.त्याच बरोबर पिकअप ची मागणीही केली जात होती.सदर मागणी पूर्ण न केल्याने मयत शीतल यांचा छळ केला जात होता अशी माहिती फिर्यादी गणेश आसबे तसेच मयत शीतलच्या आईने दिली आहे.

या प्रकरणी आरोपी विरोधात ४९८ सह भादंविच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली आहे.

# सातारा शहरात ५५ हजारांची घरफोडी

**सातारा :** सातारा शहरात अज्ञात चोरट्याने ५५ हजारांची घरफोडी केल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १७ फेब्रुवारी रोजी आठ वाजण्याच्या सुमारास डॉ. शितल चैतन्य जोशी यांच्या देशमुख कॉलनी, सदर बाजार, सातारा येथील घराच्या मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून रोख रक्कम आणि चांदीची नाणी असे मिळून एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला असल्याचा गुन्हा सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे.

# पहाटेच्या शपथविधीवरून रंगला आव्हान प्रति आव्हानाचा सामना

## पवारांच्या विधानाला फडणवीस यांचा प्रतिसवाल

**चिंचवड : प्रतिनिधी**

पहाटेच्या शपथविधीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या गौप्यस्फोटानंतर पाळलेले मौन सोडत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मोठे विधान केले आहे. पहाटेच्या शपथविधीमुळेच उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होऊ शकले, असा दावा त्यांनी केला. त्यावर फडणवीस यांनी पवार यांना आणखी स्पष्ट खुलासे करण्याचे आव्हान दिले आहे.



देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीपूर्वी राज्यात राष्ट्रपती राजवट होती. या बहुचर्चित शपथविधीमुळेच राष्ट्रपती राजवट उठली आणि उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली, याकडे शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना लक्ष वेधले.

त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, मुळाक्षरद पवार यांनी राष्ट्रपती राजवट का लागली, कोणाच्या सांगण्यावरून हे पाऊल उचलण्यात आले याचे स्पष्ट खुलासे करावे, म्हणजे या प्रकरणातील सर्वच कड्या जुळून येतील आणि वस्तुस्थिती जगासमोर येईल, असे आव्हान दिले आहे.

**निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद**


आजपर्यंत अनेक पक्षांमध्ये अंतर्गत वाद झाले. संघर्ष झाले. आम्ही सुद्धा काँग्रेसमधून बाहेर पडलो. मात्र, निवडणूक चिन्ह किंवा अख्खा पक्ष पळवून नेण्याचे प्रकार देशभरात आजपर्यंत घडलेले नाहीत. या सगळ्या प्रकरणात निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद आहे. निवडणूक आयोगाच्या वतीने नक्की कोण निर्णय घेत आहे, याबद्दल शंका घेण्यास वाव आहे, अशी टीका पवार यांनी यावेळी केली.

# लेखी आदेश निघेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार

## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पवार यांची मध्यस्थी

**पुणे : प्रतिनिधी**

एमपीएससीची परीक्षा जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणेच घेतली जावी, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी सुरू केलेले आंदोलन लेखी आदेश निघेपर्यंत सुरूच राहील, असा इशारा आंदोलक विद्यार्थ्यांनी घेतला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी रात्री उशिरा आंदोलन विद्यार्थ्यांची भेट घेतली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून बैठकही आयोजित करण्यात आली आहे.



एमपीएससीची परीक्षा नव्या अभ्यासक्रमानुसार घेण्याच्या निर्णयामुळे शेकडो विद्यार्थ्यांची तयारी वाया जाणार असून त्यांचे नुकसान टाळण्यासाठी यावर्षीची परीक्षा जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणेच घेतली जावी, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी बालगंधर्व चौकातील राणी लक्ष्मीबाई पुतळ्याजवळ आंदोलन सुरू केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोन दोन दिवस पुण्यात असूनही त्यांनी आंदोलकांची दखल घेतली नाही, असा विद्यार्थ्यांचा आक्षेप आहे. शरद पवार यांनी मात्र रात्री अकरा वाजता आंदोलकांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या समजावून घेतल्या. त्यानंतर मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आंदोलक विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला एम पी एस सी चे अध्यक्षही उपस्थित राहणार असल्याचे पवार यांनी आंदोलक विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानुसार पाच विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ पवार यांच्यासह मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन एमपीएससी परीक्षेबाबत चर्चा करणार आहेत.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सातारा शहर परिसरात राहणारी एक अल्पवयीन मुलगी क्लासला निघाली होती. ती बुधवार नाका सातारा येथील रामलीला बिल्डिंगच्या जवळ आली असता दादू उर्फ राज श्रीमंत वैराट राहणार गेंडामाल नाका सातारा याने मोपेड गाडीवरून येऊन तिचा पाठलाग करीत तिचा विनयभंग केला. या प्रकरणी त्याच्यावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक मुल्ला करीत आहेत.

# अवैध गुटखा वाहतूक प्रकरणी तळबीड पोलिसांची मोठी कारवाई

## सुमारे ८३ लाखांच्या गुटख्यासह एक कोटी तेरा लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सातारा : प्रतिनिधी**

अवैध गुटखा वाहतूक प्रकरणी तळबीड पोलिसांनी मोठी कारवाई करीत सुमारे १ कोटी १३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या आदेशान्वये दिनांक २१ फेब्रुवारी रोजी तर तळबीड पोलीस ठाणे अंतर्गत नाकाबंदी करण्यात आली होती. त्यादरम्यान तळबीड पोलिसांना माहिती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात विक्री करण्यासाठी बंदी असलेला गुटखा कर्नाटक राज्यातून आयशर ट्रक क्रमांक केए ३२ एए ३७७० मधून नेण्यात येत आहे. माहिती मिळाल्यानंतर याबाबत सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर, कराडचे उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत पाटील यांना ही माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक वरोटे व पोलिसांनी मसूर रोडवर जात माहिती मिळालेल्या गाडीची वाट पाहिली. पहाटे पावणे चारच्या दरम्यान संबंधित गाडी कराडकडून आली. ही गाडी थांबवून चालकास त्याचे नाव, गाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव मोहम्मद त्याजुद्दीन सैफुनसाब वालवाले राहणार नरोना, तालुका आलम, जिल्हा गुलबर्गा, राज्य कर्नाटक असे सांगितले. त्यावेळी गाडीमध्ये काय आहे, अशी विचारणा केली असता त्याने गाडीमध्ये कोंबडी खाद्य असल्याचे सांगितले. परंतु मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये ८३ लाख ९ हजार २९६ रुपये किमतीचा ५ हजार ७४४ किलो वजनाचा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा सापडला. हा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

# चिंचवड मतदारसंघात भगवे वादळ; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या 'रोड शो'ला तोबा गर्दी

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना व मित्रपक्ष महायुतीच्या उमेवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २२) वाकडमध्ये भव्य रोड शो केला. उघड्या गाडीतून लोकांना अभिवादन करत निघाले तेव्हा नागरिकांनी प्रचंड जल्लोषात त्यांचे जंगी स्वागत केले. या रोड शोमुळे महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. विशेषतः तरुणाईची तुफान गर्दी उसळली होती. कमळ फुलू देच्या घोषणाबाजीने तरूणाईने एकच गलका केला होता. रोड शो दरम्यान सर्व रस्ते तुडूंब भरले होते. भाजपच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केलेले हे शक्तीप्रदर्शन पोटनिवडणुकीत लक्षवेधी ठरले.




मुख्यमंत्र्यांसोबत रोड शोमध्ये भाजप-शिवसेना आणि मित्र पक्षाचे अनेक नेते सामील झाले होते. भाजप व मित्रपक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार भरत गोगावले, आमदार उमा खापरे, भाजप प्रवक्ते एकनाथ पवार, भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची कन्या ऐश्वर्या जगताप-रेणुसे यांच्यासह भाजप, शिवसेना व मित्रपक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्यमंत्री वाकड येथील दत्त मंदिराजवळील उत्कर्ष चौकात येताच महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फुलांची बरसात करत त्यांचे भव्य स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी रोड शोला सुरूवात केली. दत्त मंदिर रोडने थेरगावमधील डांगे चौक, दत्तनगर जुना जकात नाका, चिंचवडमधील चापेकर चौक, गांधीपेठ पॉवर हाउस चौक, केशवनगर, काळेवाडीतील एम. एम. हायस्कूल, कुणाल हॉटेल पासून पुढे विमल गार्डन समोरून शिवेंद्र लॉन्सपर्यंत त्यांनी भव्य रोड शो केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रोड शोमध्ये सामील झालेल्या अनेकांशी पुढे येऊन हस्तांदोलन केले. त्यांची छबी मोबाईल कॅमेऱ्याने टिपताना लोक दिसत होते.

मुख्यमंत्र्यांच्या रोड शोनिमित्त महायुतीच्या वतीने संपूर्ण मार्ग भगवेमय करण्यात आले होते. त्यांच्या रोड शोला तुफान गर्दी उसळली होती. त्यांची एक झलक पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडाली होती. रोड शोच्या मार्गावर नागरिकांनी मुख्यमंत्र्यांचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत केले. रस्त्याने ठिकठिकाणी शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात येत होता. रोड शोमध्ये कमळ फुलू दे आणि भाजपच्या विजयाच्या, महायुतीच्या जयघोषाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सगळीकडे माणसेच माणसे दिसत होती. नजर हटत नाही एवढी गर्दी झाली होती. रस्त्यांवर माणसांचा जत्थाच जत्था दिसत होता. रोड शोच्या मार्गावर प्रत्येक ठिकाणी मुख्यमंत्र्यांवर फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. मुख्यमंत्रीही कधी हात उंचावून, तर कधी हात जोडून मतदारांना अभिवादन करताना दिसत होते.

# बारावीच्या प्रश्नपत्रिकेत बोर्डाचा घोळ सुरूच

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. बोर्डाच्या परीक्षेच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत घोळ झाल्याचे समोर आले होते. हा घोळ निस्तरत असताना आता हिंदी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत चूक झाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्तापाला सामोरे जावे लागले असल्याची तक्रार करण्यात येत आहे. हिंदीच्या प्रश्नपत्रिकेत पर्यायांना चुकीचे आकडे देण्यात आल्याने नेमकं उत्तर काय लिहावे, असा प्रश्नच विद्यार्थ्यांना पडला होता.

वषयाच्या प्रश्नपत्रिकेत तीन प्रश्नांमध्ये चूक झाल्याचे मंगळवारीच उघडकीस आले होते. आज हिंदी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत चुका झाल्याचे समोर आले आहे. दोन प्रश्नांमध्ये चुकीचे उपप्रश्न क्रमांक देण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेमका उपप्रश्न क्रमांक काय टाकायचा या संदर्भात संभ्रम निर्माण झाला.

हिंदीच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्न क्रमांक दोनमध्ये चार शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहायचे आहेत. मात्र, या शब्दांचे क्रमांक १,२,१,२ असे देण्यात आले आहेत. हे क्रमांक १,२,३,४ असे असायला हवे होते. तर चार समानार्थी शब्द लिहिण्यासाठी दिलेल्या चारही शब्दांना १,१,१,१ असे क्रमांक देण्यात आले आहेत. हे क्रमांक १,२,३,४ असे असायला हवे होते.

# भाजपच्या अश्विनी जगताप यांच्या विजयासाठी थेरगाव ग्रामस्थ एकवटले

## केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचीही उपस्थिती

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप-शिवसेना मित्र पक्षाच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या विजयासाठी थेरगावचे ग्रामस्थ एकवटले आहेत. सर्व थेरगाव ग्रामस्थांची केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत सोमवारी बैठक झाली. त्यामध्ये अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनीही मतदानादिवशी जास्तीत जास्त मतदारांना बाहेर काढून मतदान करून घेण्याचे आवाहन थेरगाव ग्रामस्थांना केले.



थेरगाव येथीर बापुजीबुवा मंदिरात थेरगाव ग्रामस्थांनी घोंगडी बैठक झाली. यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, थेरगावचे ग्रासस्थ व शिवसेना खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे विधीमंडळातील पक्षप्रतोद भरत गोगावले, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, माजी उपमहापौर झामाबाई बारणे, युवासेना शहरप्रमुख विश्वजीत बारणे, माजी नगरसेवक निलेश बारणे, अभिषेक बारणे, सिद्धेश्वर बारणे, माजी नगरसेविका मनिषा पवार, विमल जगताप, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य संदिप गाडे, सामाजिक कार्यकर्ते तानाजी बारणे, काळुराम बारणे, करिष्मा बारणे, नरेंद्र माने, संतोष गुलाब बारणे यांच्यासह थेरगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी शहरात केलेल्या विकासकामांचा उल्लेख करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोटनिवडणूक ही संधी असल्याचे सांगितले. सर्व थेरगाव ग्रामस्थांनी एक होऊन त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी आपण सर्वांनी खांद्याला खांदा मिळवून काम करूया, असे आवाहन केले. माजी उपमहापौर झामाबाई बारणे यांनीही दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या कामाचा गौरव केला. त्यांच्यासारखा नेता शहरात पुन्हा होणे नाही, अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच आपण सर्व थेरगाव ग्रामस्थ एक असल्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय पक्का असल्याचा विश्वास व्यक्त केला.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या विजयासाठी एकत्र आलेल्या थेरगाव ग्रामस्थांचे कौतुक केले. त्यांनी आयुष्यभर केलेल्या विकासकामांना थेरगाव ग्रामस्थांनी दिलेली ही पोचपावती असल्याचे ते म्हणाले. पोटनिवडणूक असल्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत कोणतीही कमी पडता कामा नये. त्यामुळे थेरगाव ग्रामस्थांनी येत्या रविवारी होणाऱ्या मतदानादिवशी प्रत्येक मतदाराच्या घरांपर्यंत जाऊन त्यांना मतदानासाठी बाहेर काढावे, असे आवाहन त्यांनी केले. थेरगाव ग्रामस्थ एक झाल्याने अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा विजय कोणीही रोखू शकणार नसल्याचे रावसाहेब दानवे म्हणाले.

# अकलूजच्या शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती हर्षोल्हासात साजरी

**अकलूज : प्रतिनिधी**

यशवंत, किर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, जाणता राजा म्हणजे शिवाजी महाराज. ज्यांच्या अंगी वीज लखलखते, तेज माथी चमकते असे छत्रपती शिवाजी महाराज. निश्चयाचा महामेरू! बहुत जनांसी आधारू! अखंड स्थितीचा निर्धारू! राजाधिराज यांची ३९३ वी जयंती शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये साजरी करण्यात आली.

तलवारी सगळ्यांच्या हातात होत्या, ताकद सगळ्यांच्या मनगटात होती पण स्वराज्य स्थापनेची इच्छा फक्त मराठी रक्तातच होती. मातृभक्त, लोकपालक, उत्तम प्रशासक, स्वधर्मचिकित्सक, सामाजिक क्रांतिकारक, नारीरक्षक, पर्यावरण रक्षक,चिकित्सक व्यक्तिमत्व, जलतज्ञ उत्तम अभियंते आणि खऱ्या अर्थाने ते लोकराजे होते कारण ते धर्म जातीच्या पलीकडे जाऊन सुखी जनतेचे स्वप्न पाहत होते.



छत्रपती शिवरायांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून. सूरज दीपक बनकर यांची निवड करण्यात आली. ते महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण मार्फत घेण्यात आलेल्या सहाय्यक अभियंता या परीक्षेमध्ये महाराष्ट्र राज्यात दुसऱ्या क्रमांकावर उत्तीर्ण झाले आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रशालेतील विद्यार्थ्यांची भाषणे झाली, कुणी पोवाडा सादर केला तर कुणी शिवगर्जना केली. विद्यार्थ्यांच्या या अप्रतिम सादरीकरणानंतर प्रशालेतील शिक्षक अभिषेक काटकर सर यांनी एका उत्तम व्याख्यात्याच्या भूमिकेत आपले मत मांडले त्यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख सर यांनी शिवजयंतीच्या निमित्ताने आपली भूमिका मांडली आणि कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शिवजयंतीच्या शुभेच्छा देऊन करिअरपर मार्गदर्शन केले.

अशा उत्तम व्यवस्थापनामध्ये आजचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. कीर्ती तानाजी साठे हिने केले तर आभार प्रदर्शन प्रशालेतील शिक्षक. रणजीत माने देशमुख सर यांनी केले.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर गुन्हा दाखल करा

## पंढरीत ठाकरे समर्थकांची शहर पोलीस ठाण्यात धाव

**पंढरपूर : प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबाबत भाजपचे वरिष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्र दौऱ्यात अपशब्द वापरले व शिवराळ भाषेचा प्रयोग केला असून त्यामुळे अमित शहा यांच्यावर भादंवि १५३(अ), ४९९, ५००, ५०६ नुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पंढरपूर शहर पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्याकडे निवेदन देत ठाकरे समर्थकांनी केली आहे.

अमित शहा यांच्या अशा वक्तव्यामुळे राज्यात आणि देशात शांततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो,त्यांच्या वक्तव्यामुळे भावनेला व श्रद्धेला हानी पोहोचली आहे असेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




हे निवेदन देताना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे, उपजिल्हा प्रमुख सुधीर अभंगराव, तालुका प्रमुख संजय घोडके, शहर प्रमुख रवी मुळे, पंढरपूर शहर समन्वय प्रमुख माउली अष्टेकर, युवा सेना प्रमुख श्रीनिवास उपळकर, शहर उपप्रमुख तानाजी मोरे, दिगंबर सावंतराव, विनय वणारे, अविनाश वाळके, बाबा अभंगराव, विशाल डोंगरे, प्रदिप बडवे, पिंटू गायकवाड, युवा सेना उपजिल्हा प्रमुख अक्षय माने आदी उपस्थित होते.

### सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी महिलेवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी महिलेवर लोणंद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता लोणंद तालुका खंडाळा गावच्या हाती एचपी पेट्रोल पंपा समोर असणाऱ्या सुरभी ढाबा येथे वैशाली महेश पवार राहणार लोणंद तालुका खंडाळा ही महिला दारू पिऊन गोंधळ घालीत गैरवर्तन करताना आढळून आली.

या प्रकरणी तिच्यावर लोणंद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस नाईक गलंडे करीत आहेत.

# शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ४९ जणांचे रक्तदान; २९० रोपांची लागवड

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज ग्रामपंचायत माजी सरपंच शिवतेजसिंह मोहीते पाटील साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शिवकिर्ती युवा मंच व शिवतेजसिंह मोहीते पाटील मित्रमंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ४९ जणांनी रक्तदानात सहभाग घेतला तर अकलूज परिसरात २९० रोपांची लागवड करण्यात आली.

शिवकिर्ती युवा मंच अकलूज शाखेच्या वतीने जुने बस स्टँड भाजी मंडई येथे नागरिकांसाठी नाष्टा व चहा वाटप तसेच भव्य अशा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचे उद्घाटन शिवशंकर बझारच्या अध्यक्षा स्वयंप्रभादेवी मोहीते पाटील, शिवतेजसिंह मोहीते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, आय एम ए चे अध्यक्ष डॉ.संतोष खडतरे, अनिल उघडे, राहुल बोबडे, प्रकाश गायकवाड, प्रितम एकतपुरे, मनोज क्षिरसागर, नाना साळुंखे, रोहित शेटे उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवतेजसिंह मोहीते पाटील मित्रमंडळ व शिवकिर्ती युवा मंच कार्यकर्ते किशोर लोखंडे, सुरज बाबर, सोमनाथ कचरे, संग्राम ऐवळे यांनी परिश्रम घेतले.



अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सदस्य गणेश वसेकर सुनिल अडगळे, पद्मराज ढवन, सुनिल पवार, आकाश ढावरे यांच्या वतीने शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या २९ व्या वाढदिवसानिमित्त चिंच, बकुळ या वृक्षांच्या २९० रोपांची भेट देऊन लागवड करण्यात आली.

तसेच कोळेगांव येथे शिवकिर्ती युवा मंचच्या शाखेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कोळेगाव येथे सर्व ११७ विद्यार्थी यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी कोळेगाव चे माजी सरपंच, विजयसिंह मोहिते पाटील विद्यालय व्यवस्थापन समिती अध्यक्ष धनंजय दुपडे, कोळेगाव शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धनंजय सावंत, शिवकीर्ती युवा मंच चे अध्यक्ष सुभाष बंदपट्टे उपस्थित होते.

# भाडेकरार नियमाने नाही; अशा करबुडव्यांवर कारवाई करा!

## बाणेर, बालेवाडी, औंध परिसरातील प्रकार; पोलिसांचे आर्थिक लागेबांधे

**औंध : रमेश जयसवाल**

भाडेकरू सहज मिळावे आणि पूर्ण भाडे आपल्यालाच मिळावे, शासनाला कर भरण्याची पाळी येऊ नये म्हणून खाली प्लॉटवर अनेक ठिकाणी भिंती उभारून किंवा टिनाचे शेड उभारून बाणेर, बालेवाडी, औंध आणि इतर ठिकाणी भाडेतत्वावर किराणा दुकान, रहिवाशांसाठी घरे, शेड उभारून दिल्या जातात. यात बिहार, पं. बंगाल, उत्तर प्रदेश, झारखंड अशा अनेक ठिकाणचे कामगार, मजूर, दुकान व्यावसायिक, भंगार गोळा करणारे या खोल्या भाड्याने घेतात. भाडेकरू गुन्हेगारी प्रवृत्तीचा की गुन्हे करणारे याचे घरमालकांना काही घेणेदेणे नाही.

उत्पन्न लपविण्याकरिता संबंधित मालकांकडून भाडेकरार तोंडी केला जातो. शासनाच्या नियमानुसार केला जात नाही. काही वेळेस १०० किंवा ५०० रुपयांच्या स्टॅम्पवर साधे लिखाण करून भाड्याने दिल्या जातात. या विभागात परराज्यातून येणारे कामगार, पथारीवाले, मजूर आणि इतर व्यवसाय करणारे फार राहतात. यांना भाडेकरार कसा करावा माहीत नसते. भाडेकरार कसा करावा, कोठे करावा किंवा कोणती कागदपत्रे लागतात, याची माहिती नसते. आणि भाडेकरार नियमाने केल्यास जास्त खर्च येतो, अशा भावना त्याच्या मनात घुसविल्या जातात. याचाच फायदा घरमालक घेतात. असे घर भाड्याने देतात, याची कल्पना पोलिसांना असते. तेही याचा फायदा घेत घरमालकांकडून हप्ते घेऊन चूप बसतात. परराज्यातून येणारे गुन्हेगार आहेत की नाहीत, याची पडताळणीसुध्दा केली जात नाही. याचा फायदा घेत आणि कोणतेही कष्ट न करता औंध, बाणेर, बालेवाडी विभागात घर भाड्याने सहज मिळते, याची जाणीव गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना माहीत असते.

- साध्या स्टॅम्पवर होतात करार
- यांना मनपाच्या फार सुविधा
- गुन्हेगार प्रवृत्ती वाढण्याची शक्यता

भाडेतत्वावर घरे किंवा दुकाने दिलेल्या लोकांना नळकनेक्शन आणि विद्युत मीटर सहज मिळते. अशा लोकांना असल्या सुविधा कशा दिल्या जातात, हा संशोधनाचा विषय आहे. यात पोलीस, एमएसईबीचे अधिकारी, मनपाचे अधिकरी हात धुवून घेताना दिसतात. यामुळे सर्व मुभा घरमालकांना दिल्याचे दिसते. नियमानुसार ही बाब खर्च देणारी आणि कर भरावा लागेल म्हणून घरे, दुकाने भाडेकरार नियमानुसार होत नाही. अनेक ठिकाणी शेड उभारून राजरोसपणे भाडेतत्त्वावर घरे देण्याचा गोरखधंदा या विभागात सुरू आहे. यावर कोणाचेही बंधन नाही. येणारे परराज्यीय कसे आणि कशा प्रकारचे गुन्हे असलेले की गुन्हेगार प्रवृत्तीचे, याचे काही घेणेदेणे नाही. घरमालकांना भाडे भरपूर मिळते म्हणून वेशाव्यवसाय करणारेसुध्दा राहतात. मोठमोठाले गुन्हेगार आणि गुन्हे करणारेसुध्दा राहत असतील, याची कल्पना पोलीस विभागाला नसते काय?

अशा प्रकारे घरे भाड्याने दिलेल्या ठिकाणी आग लागली तर कोण जबाबदार? घरे भाड्याने देत असताना करारनामा नियमानुसार केला गेला की नाही, आणि भाडेकरू कोण राहतात, याची नोंद स्थानिक पोलीस स्टेशनला द्यावी लागते, पण हे नियमाने होत नसल्यामुळे आणि उत्पन्न लपविण्याच्या नादात तसेच हप्ते गोळा करण्याच्या नादात राहणारे भाडेकरू कोणते गुन्हे करतील, हे काळच ठरवेल. अधिकारी आणि खोली मालकाकडून अघोरी प्रकार सुरू आहे. एखाद्या वेळेस फार मोठ्या संकटाला सामना करावा लागेल. असल्या करबुडव्या मालकांवर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी कारवाई करावी, नाहीतर परराज्यातून येणारे कधी कोणता गुन्हा करतील, हे कळणार नाही.

# पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**पंढरपूर : प्रतिनिधी**

पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंतीच्या निमित्ताने नगरपरिषदेचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या शुभहस्ते शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन व अभिवादन करुन साजरी करण्यात आली. यावेळी जय जिजाऊ , जय शिवराय जयघोषांनी परिसर दुमदुमला.



यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त माजी आमदार दत्तात्रय सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गट विकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सुनिल वाळुंजकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच माजी नगराध्यक्ष साधनाताई भोसले, माजी उपनराध्यक्ष नागेश भोसले, युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक तसेच मान्यवर पदाधिकारी, माजी नगरसेवक यांनीही अशावरुढ पुतळ्यास पुष्पहार आर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी 'महाराष्ट्राचे राज्यगीत' रेडिओ स्टार दिलीप टोमके व सहकारी यांनी गायले. यावेळी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जमिनीवर बसून जेवणाचे १० फायदे



**सुंदर विचारधारा**
सौजन्य : आरती जोशी

जमिनीवर बसून जेवल्याने, जेवणाचा वेग मंदावतो व पोट आणि मेंदूतील समन्वयता सुधारते. परिणामी अतिप्रमाणात खाण्याची वृत्ती कमी होते व वजनही काबूत राहते.

- **पचन सुधारते**

जमिनीवर मांडी घालून बसल्याने, अर्धपद्मासनाची स्थिती निर्माण होते. तसेच जमिनीवर ताट असल्याने जेवणाचा घास घेण्यासाठी वाकावे लागते या सतत होणार्या शारीरिक हालचालीमुळे पोटाजवळील स्नायूंना चालना मिळते व पचनाची क्रियादेखील सुधारते.

- **वजन घटवण्यास मदत होते**

जमिनीवर बसून जेवल्याने, वजन कमी होण्यासही मदत होते. वजन वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रमाणापेक्षा अधिक खाणे. जमिनीवर बसून जेवताना 'वेगस नर्व्ह' (पोटाकडून मेंदूला संकेत देणारी) भूक व जेवणाचे प्रमाण योग्यप्रकारे राखू शकते. टेबलापेक्षा

- **लवचिकता वाढवते**

पद्मासनात बसल्याने, पाठीचे, कमरेतील तसेच पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने पचनसंस्थेचा मार्ग सुधारतो. अशा स्थितीत बसल्याने पोटावर ताण येण्याऐवजी जेवण पचण्यास व ग्रहण करण्यास मदतच होते. परिणामी पोटाजवळील स्नायूंवर ताण आल्याने शरीर लवचिक व आरोग्यदायी बनण्यास मदत होते.

- **मन शांत होते व खाण्यावर लक्ष केंद्रित होते**

जमिनीवर बसून जेवल्याने मेंदू शांत होतो व तुमचे सारे लक्ष जेवणाकडेच राहते. मनाची अस्थिरता कमी झाल्याने, जेवणातून मिळणारी पोषणतत्त्वे शरीर अधिक उत्तमप्रकारे ग्रहण करण्यास समर्थ होते.

- **कुटुंबातील सदस्यांशी जवळीक वाढते**

दिवसातील किमान एका जेवणाचा आपल्या कुटूंबासोबत जरूर आनंद घ्यावा.दिवसभरातील क्षीण व ताणतणाव हलका होतो. तसेच एकमेकांशी बोलल्याने, काही समस्यांतून मार्ग शोधण्यास मदत होते व नकळत कुटूंबातील सदस्यांशी जवळीक वाढते.

- **शरीराची स्थिती (पॉश्चर) सुधारते**

शरीराची स्थिती उत्तम राखणे हे निरोगी आरोग्याचे गमक आहे. शरीरातील काही स्नायू व सांध्यांवरील अतिरिक्त ताण कमी करून थकवा कमी होण्यासदेखील मदत होते. जमिनीवर बसून जेवताना पाठीचा कणा ताठ राहतो व पोट, खांदा व पाठीच्या स्नायूंची योग्य प्रमाणात हालचाल होते.

- **दीर्घायुषी बनवते**

ही अतिशयोक्ती नाही. जमिनीवर बसून जेवल्याने आयुष्य वाढते. 'ए्रीअेंशिरप गेींऑपरश्र `ष झअॅर्शींशपींळींश उरअॅवळेश्रेसू'च्या अहवालात प्रसिद्ध केलेल्या अभ्यासानुसार, जमिनीवर मांडी घालून बसलेली व्यक्ती जर कशाचाही आधार न घेता उठली तर त्यांचे आयुष्यमान अधिक आहे, असे समजावे. कारण अशा स्थितीतून उठण्यासाठी शरीराची लवचिकता अधिक असणे गरजेचे आहे. आणि जी व्यक्ती उठू शकत नाही त्यांचा मृत्यू नजीकच्या ६ वर्षात होण्याची शक्यता ६.५ पटीने अधिक असते.

- **गुडघे व कमरेतील सांधे मजबूत होतात**

Yoga for Healing या पुस्तकाचे लेखक पी.एस. वेंकटेशवरा यांच्यामते, पद्मासनामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. पचन संस्थेसोबतच सांधेदुखीचा त्रास होत नाही. गुडघा, घोटा व कंबरेतील सांधे लवचिक राहिल्याने अनेक विकार दूर होण्यास मदत होते. जमिनीवर बसल्याने स्नायूंबरोबर सांध्यांची लवचिकतादेखील वाढते.

- **चंचलता कमी होते**

मांडी घालून किंवा पद्मासनात बसल्याने नसांमधील थकवा कमी होतो. म्हणूनच जेवताना जमिनीवर मांडी घालून बसण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे मन, मेंदू व परिणामी शरीरातील त्रास कमी होतात.

- **हृदयाला होणारा रक्तपुरवठा सुधारतो**

काही वेळेस जेवल्यानंतर तुम्हाला गरम होते किंवा घाम आल्याचे आठवते का ? हो हे शक्य आहे. कारण अन्नाचे पचन होण्यासाठी शरीराला उर्जेची अधिक गरज असते. खुर्चीवर बसण्याऐवजी जमिनीवर बसून जेवल्याने शरीरातील रक्तप्रवाह सुधारतो. तसेच पचनही सुधारते.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# सरकारच्या मंत्रीमंडळ विस्ताराअभावी विकासाला खीळ - आ. बाळासाहेब पाटील

## माजी मंत्री आ. बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते होळीचागाव येथे विविध विकासकामांचं उद्घाटन

**वडूज : प्रतिनिधी**

राज्यात सत्तेत असलेल्या मंत्रीमंडळात मंत्री महोदयांची पुरेशी संख्या नसल्याने, एका मंत्री महोदयांकडे अनेक खात्यांची जबाबदारी आहे, मंत्री महोदयांनी त्या त्या विभागाला न्याय देण्याचे काम केले पाहिजे, राज्य सरकारने मंत्रिमंडळ विस्तार केला नाही त्यामुळे कोणत्याही विभागाला न्याय मिळत नाही, यामुळे जनतेचे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत पर्यायाने राज्याच्या विकासाला खीळ बसली आहे, असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब पाटील यांनी केले.

होळीचागांव ता.खटाव येथे विविध विकास कामांच्या भूमिपूजन व उद्घाटन आणि नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व सदस्यांच्या सत्कार समारंभ अशा संयुक्त कार्यक्रमाप्रसंगी आ पाटील बोलत होते.

यावेळी खासदार श्रीनिवास पाटील, सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील माने, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र गुदगे, जितेंद्र पवार, नंदकुमार मोरे, सी.एम.पाटील, सुरेश पाटील, सुहास पिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानीक विकास निधीअंतर्गत होळीचागांव येथे सिध्दनाथ मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे, डोंगरी विकास निधी योजनेतून प्राथमिक शाळेस संरक्षक भिंत बांधणे, स्थानीक विकास निधीतून मारूती मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे, जनसुविधा योजनेतून स्मशानभूमी सुधारणा करणे,



अर्थसंकल्प अनुदान सन- मार्च २०20 मधून रा.मा.६0 ते बनपूरी-अंबवडे-होळीचागांव-शेनवडी-चोराडे ते रा.मा.१४३ रस्ता प्रजिमा ९.६ कि.मी.९/६00 ते १५/२00 (भाग होळीचागांव ते चोराडे) रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, रा.मा.१४0 ते नांदोशी-औंध-पळशी- निमसोड-मोराळे रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण करणे प्रजिमा. ४२ कि.मी. ११/00 ते १ ९ / ५00 (भाग-पळशी-भूषणगड-होळीचागांव-निमसोड), जलजीवन मिशन योजनेतून नवीन वितरण व्यवस्था करणे, डोंगरी विकास निधी योजना अंगणवाडी क्र.२ साठी इमारत बांधणे, विशेष घटक साकव योजनेतून होळीचागांव येथील मागासवगीय वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील ओढ्यावर साकव पूल बांधणे. डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना मागासवर्गीय वस्तीत अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे व बंदिस्त आर.सी.सी. गटर बांधणे, मागासवर्गीय वसाहतीमधील अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे, जिल्हा वार्षिक योजना २०२२-२३ मधून लघु पाटबंधारे विभाग-सिमेंट बंधारा बांधणे जिल्हा वार्षिक योजना - २०२२-२३ - कृषी विभाग -सिमेंट बंधारा बांधणे, जनसुविधा योजनेतून आर.सी.सी. गटर बांधणे, स्मशानभूमी सुधारणा करणे, रोजगारहमी योजनेअंतर्गत प्राथमिक शाळा परिसरामध्ये पेव्हर ब्लॉक बसवणे, शिंदे मळ्याकडे जाणारा पाणंद रस्ता सुधारणा करणे, प्राथमिक शाळा खोली दुरूस्ती योजनेतून प्राथमिक शाळाखोली दुरूस्ती करणे. आदी. नव्याने मंजूर झालेल्या कामांचे भूमिपूजन व पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन करण्यात आले.

आमदार बाळासाहेब पाटील पुढे म्हणाले की, राज्यात सध्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका पालिका, नगरपालिका यांवर प्रशासक आहेत, सरकार निवडणूक घेण्याचे धाडस करत नाही, सरकार कोणत्या मार्गाने सत्तेत आले आहे, हे सर्व जनतेला माहीत आहे, निवडणुका घेतल्या तर सरकारला धक्का बसू शकतो या भीतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या जात नाहीत.

यावेळी खासदार श्रीनिवास पाटील, सुनील माने, जितेंद्र पवार, सुरेंद्र गुदगे, नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खटाव पंचायत समितीचे माजी सदस्य भाऊसाहेब लादे यांनी केले, सूत्रसंचालन उपसरपंच रणजीत शेटे यांनी केले व आभार पांडुरंग शिंदे (नाना) यांनी मानले.

कार्यक्रमावेळी नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व सदस्य यांचा सत्कार मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष घार्गे, महादेव माने, महम्मद आवटे, पुसेसावळीचे सरपंच दत्तात्रय रुद्रके, तुषार माने, शिवाजी शिंदे, कृष्णत पिसाळ, सचिन माने, आनंदराव यादव, दाऊद पटेल, लहुराज जाधव, विलास शिंदे, शिवाजी माने, विठ्ठल माने, प्रदीप माने, मदने गुरुजी, बाळूभाई पटेल, संभाजी माने, हणमंत भोसले, ज्ञानेश्वर कोकाटे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# मटकाकिंग समीर कच्छी याला अटक केल्यानंतर तक्रारदारांची पोलिसांकडे रांग

## समीर कच्छीसह टोळीवर सावकारी व दरोड्याचा गुन्हा दाखल

**सातारा : प्रतिनिधी**

मटकाकिंग समीर कच्छी याला जुगार प्रकरणी तालुका पोलिसांनी अटक केल्यानंतर तक्रारदारांची पोलिसांकडे रांग लागली असून त्याच्यासह टोळीवर सावकारी व दरोड्याचा गुन्हा दाखल झाला आहे. सावकारीचे पैसे देत नसल्याने तक्रारदार यांना जबरदस्तीने मटका घेण्याचे काम लावले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी मटका बहाद्दरांच्या मुसक्या आवळल्याने गुन्हेगारी जगतात खळबळ उडाली असून अनेक टोळ्या रडारवर आल्या आहेत.

समीर सलीम शेख उर्फ कच्छी (रा. मोळाचा ओढा, सातारा), साहिल शेख अर्फ भैय्या, अक्षय तळेकर, अमर पवार, वृषभ राउत अशी संशयित आरोपींची नावे आहेत. दरम्यान, याप्रकरणी सातारा तालुक्यातील एकाने तक्रार दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, यातील तक्रारदार यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी संशयित समीर कच्छी याच्याकडून ५ लाख रुपये व्याजाने घेतले. वास्तवीक कच्छीकडे कोणत्याही व्याजाचा परवाना नाही. व्याजाने घेतलेली रक्कम फेडत असताना संशयितांनी आणखी पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली. तक्रारदार पैसे देत नसल्याचे पाहून संशयितांनी त्यांना जबरदस्तीने मटका, जुगार एजंटचे काम करण्यास सांगितले. संशयितांनी दमदाटी, शिवीगाळ व मारहाण केल्याने अखेर तक्रारदार यांनी तेही काम करण्यास सुरुवात केली.

पैसे सर्व दिल्यानंतरही संशयित व्याजाची रक्कम शिल्लक असल्याचे सांगून तक्रारदार व त्यांच्या पत्नीला दमदाटी करुन मारहाण करत होते. ही सर्व घटना दि. १ सप्टेबर २०२२ ते १८ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत घडली आहे. या वेळी संशयितांनी तक्रारदार यांच्या घरात घुसून जबरदस्तीने १0 हजार घेतले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरुन पोलिसांनी दरोडा, सावकारीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# फलटण येथील जुगार अड्ड्यावर छापा; सात जणांवर गुन्हा

**सातारा** : फलटण येथील जुगार अड्ड्यावर छापा मारत पोलिसांनी सात जणांवर गुन्हा नोंद केला आहे. त्यांच्याकडून एकूण ३ लाख १८ हजार ६३0 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, मंगळवार पेठ फलटण येथील खंडोबा मंदिराजवळ जुगार खेळताना विकी रामभाऊ बोके, अजय यशवंत ढावरे (दोघेही राहणार मंगळवार पेठ फलटण), प्रकाश किसन काकडे राहणार सांगवी तालुका फलटण, समीर जमशेद मुलानी राहणार पिंप्रद तालुका फलटण, अक्षय किशोर वाघमारे, रोहन साजन काकडे, राहुल सुरेश काकडे (तिघेही राहणार मंगळवार पेठ फलटण) आढळून आले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम, एक मोबाईल, दोन मोटरसायकल असा एकूण ३ लाख १८ हजार ६३0 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# शिवजयंतीनंतर किल्ले अजिंक्यतारावर राबवली स्वच्छता मोहीम

**सातारा : प्रतिनिधी**



राजधानी सातारा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने ३९३ व्या शिवजयंतीच्या निमित्त चार दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंतीनंतर समितीच्यावतीने किल्ले अजिंक्यतारावर स्वच्छता मोहीम राबवून कचरा निर्मूलन करण्यात आले.

शिवजयंती महोत्सवानिमित्त किल्ले अजिंक्यतारा येथे गड पूजन व मशाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मशाल महोत्सवामध्ये १000 मावळ्यांनी किल्याच्या तटावर मशाली हातामध्ये घेतल्या होत्या व तेवढेच स्वयंसेवक त्या ठिकाणी उपस्थित होते. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या व इतर खाण्याचे साहित्य यामुळे गडावर कचरा जमा झाला होता. याचा विचार करून आ. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी अजिंक्यतारा किल्ल्यावरील कचरा उचलण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार मंगळवारी दुपारी शिवजयंती महोत्सव समितीच्या सदस्यांनी किल्ले अजिंक्यतारावर स्वच्छता मोहीम राबवून कचरा निर्मूलन केले. या स्वच्छता मोहीममध्ये नगरसेवक अमोल माहिते, राजू गोरे, रविंद्र खरात, हर्षल चिकणे, सूरज जांभळे, काळे, पिंटू कुमठेकर यांच्यासह नगरपालिकेचे अधिकारी बडेकर व त्यांचे कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गर्दी, मारामारी प्रकरणी अकरा जणांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

गर्दी मारामारी केल्याप्रकरणी अकरा जणांवर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ फेब्रुवारी रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास शाहूपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक स्वप्निल शिवाजी कुंभार हे सातारा शहरातील मारवाडी चौक, राजपथ येथे कर्तव्य बजावत असताना मिरवणुकीतील जुन्या भांडणाच्या कारणावरून ओंकार शांताराम नलावडे राहणार मंगळवार पेठ सातारा, श्रेयस श्रीकांत खंडजोडे राहणार कामेरी फाटा सातारा, आनंद लक्ष्मण माने राहणार दिव्य नगरी सातारा अर्जुन रामदास साळुंखे राहणार सारखळ तालुका सातारा, योगेश गणेश गुरव राहणार दिव्य नगरी सातारा, राम मारुती कोकरे राहणार दिव्य नगरी सातारा व संदीप पवार, शुभम पवार, अनिकेत नलवडे, ओंकार नलवडे रोहन पवार सर्व रा. मंगळवार पेठ, बोगदा परिसर, सातारा हे एकमेकांना मारहाण करताना आढळून आले.

या संबंधितांवर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार ढमाळ करीत आहेत.

# कलेढोण येथील रेशनिंग दुकानदाराच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी व्हावी; ग्रामस्थांची मागणी

## तहसीलदार व पुरवठा आधिकारी यांना ग्रामस्थांनी दिले निवेदन

**मायणी : प्रतिनिधी**

गेले अनेक वर्षांपासून कलेढोण येथील रेशनिंग दुकानदारांचा मनमानी कारभार सुरू असून त्याच्या या मनमानी विरुद्ध अनेकवेळा लेखी, तोंडी तक्रार नोंदवली गेली; परंतु या दुकानदारांवर कोणतीच कारवाई झाली नाही. उलट त्यांचा उद्दामपणा जास्तच वाढला आहे. संपूर्ण महिन्याचे रेशनिंग हडप करणे, आपल्या सोयीने दुकान उघडणे अथवा बंद करणे, ग्राहकांना उद्धटपणे बोलणे, रेशनिंगचा काळाबाजार करणे, असे अनेक आरोप करीत कलेढाणच्या ग्रामस्थांनी रेशनिंग दुकानदार याच्या विरोधात तहसीलदार व



पुरवठा आधिकारी यांना निवेदन दिले आहे. या दुकानदारांवर कारवाई करून त्यांचा परवाना रद्द करावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर सुरेशशेठ शिंदे, चंद्रकांत पवार, राजुशेठ जुगदार यांच्या तर नाना बापू गटातील सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

सर्वसामान्य जनतेच्या तोंडातील घास हिसकावून घेण्याचे पाप हे दोन्ही दुकानदार करीत आहे.यांच्याकडून संपूर्ण मालाचे वितरण होत नाही, तसेच कोणत्याही प्रकारची पावती ग्राहकांना दिली जात नाही, दुकान आपल्या मर्जीने उघडले जाते व बंद केले जाते, या बाबत कोणी विचारणा केली तरी त्यांना उद्धट उत्तरे दिली जातात याचाच भाग म्हणून ग्रामस्थांनी अनेक वेळा तक्रारी करून ही दुकानदारांच्या वागण्या बोलण्यात सुधारणा होत नाही म्हणून अखेर सत्ताधाऱ्यांनी या दोन्ही दुकानदारांच्या विरोधात निवेदन दिले असून ,दुकानदारांनावर कारवाई करावी अन्यथा यांच्या विरोधात सामूहिक उपोषण करू असे ही या निवेदनात म्हंटले आहे.

> **गोडावूनमधुन माल वितरित केल्यापासून लोकांना मालाचे वाटप होत नाही तोपर्यंत दिवसभर दुकान उघडे असणे आवश्यक असते, तसेच त्या त्या महिन्यातला माल (धान्य) वेळेवर वाटप करणे गरजेचे आहे. तसेच ग्राहकांना मालाची पावती देणे बंधनकारक आहे. असे न केल्यास त्या दुकानदारावर कडक कारवाई करण्यात येईल.**
>
> **– ए. के. शिंदे, पुरवठा आधिकारी**

> **कलेढोणमधील रेशनिग दुकानदार म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण आसून सर्वसामान्यांना न्याय कसा मिळणार? दुकानदार, सरपंच, दक्षता कमिटी अध्यक्ष एकाच घरातील, त्यामुळे न्याय कसा मिळणार? कुंपणच जर शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची?**
>
> **– ग्रामस्थ, कलेढोण**

# साताऱ्यात अंगणवाडी सेविका-मदतनीसांचा भव्य मोर्चा

**सातारा : प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविका - मदतनीस यांनी विविध मागण्यांसाठी येथील जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढून निवेदन सादर करण्यात आली.




निवेदनात अंगणवाडी सेविका-मदतनीस यांनी म्हटले आहे की, मानधनाऐवजी पगार मिळावा, सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, सेवानिवृत्तीनंतर मासिक पेन्शन, गॅज्युएटी, थकीत एकरक्कमी पेंशन व्याजासह मिळावी, मानधन पगार दरमहा ५ तारखेपर्यंत मिळावेत, इतर राज्यांप्रमाणे जास्त मासिक मानधन मिळावे, राज्य सरकारने समान काम, समान वेतन घटनेच्या कलम १४ प्रमाणे कार्यवाही करावी, कोव्हिड काळातील प्रोत्साहन भत्ता सेवीका व मदतनीस यांना देण्यात यावा, मोबाईल रिचार्ज दरवाढ व्हावी, सेविका मदतनीस यांच्या रिक्त जागा भरण्यात याव्यात, सुप्रीम कोर्टाचे निर्णय व हायकोर्टाचे निर्णय यांचा आधार करून केंद्र व राज्य सरकारने निर्णय करावेत, घटनात्मक मागणीसाठी संप असल्याने संपकाळ कर्तव्य अर्थ मानधनी सेवा समजली जावून आंदोलन काळात कोणतीही कपात केली जाऊ नये, अशा अनेक मागण्यांचे निवेदन राज्याध्यक्ष सुजाता रणनवरे तसेच सातारा जिल्हा अंदोलन समिती अध्यक्ष छाया पन्हाळाकर, मिनी अध्यक्षा मनिषा चव्हाण व जिल्हाध्यक्षा ग्रामीण अर्चना अहिरे यांच्या स्वाक्षरीनिशी निवेदन संबंधितांना देण्यात आले.

यावेळी सेविका मदतनीस तसेच अंदोलन समितीचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# मारहाण प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा** : एकास लाकडी दांडक्याने मारहाण केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १३ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजता सुमारास आकाश वासुदेवानंद राहणार करंजे तर्फ सातारा याला मोबाईल घेतल्याच्या संशयावरून गणेश पूर्ण नाव माहित नाही राहणार रविवार पेठ सातारा याने लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केले आहे. याप्रकरणी त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

# विद्यार्थ्यांचा 'जल्लोष २०२३' उत्साहात

■ जि.प. शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा दिमाखात साजरा



**वावरहिरे : प्रतिनिधी**

महाशिवरात्री उत्सवा निमित्त वावरहिरे ता. माण येथील जि.प. प्राथमिक शाळेचा 'जल्लोष २०२३' हा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

महाशिवरात्री निमित्त वावरहिरे गावचे ग्रामदैवत असलेल्या श्री पाणलिंग पालखी कावड यात्रेनिमित्त जि.प.प्राथमिक शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गीतावर नृत्य सादर करुन अगळावेगळा कला अविष्कार सादर केला. फिल्म स्टुडिओ सारखा, मुंबई -पुण्याच्या धर्तीवर उभारलेला भव्य दिव्य रंगमंच, झगमगटुन टाकणारा प्रकाश, उत्कृष्ट संगीत व्यवस्था भारतीय संस्कृतीची वारसा सांगणारी गीते, देशभक्तीपर गीतांचे मैफिल, पोशाखांची रंगसंगती या स्नेह संमेलनात उपस्थितांना पाहायला मिळाली.

मराठमोळ्या लावण्या, लोकगीते, हिंदी गीते, देशभक्तीपर गीते ,पारंपारिक वेशभूषेत नृत्य अविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यास उपस्थितांनी शिट्ट्या आणि टाळ्यांचा जोरदार प्रतिसाद दिला. या कार्यक्रमांने सोसायटीचा परिसर प्रेक्षकांनी भरगच्च भरला होता.

> **सांस्कृतिक उपक्रमाचे कौतुक**
>
> **यात्रेनिमित्त जि. प. प्राथमिक शाळेच्या वतीने पार पडलेल्या 'जल्लोष २०२३' वार्षिक स्नेहसंमेलन या गुणवत्तापुर्ण असलेल्या सांस्कृतिक उपक्रमाचे माण तालुका पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मण पिसे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत या कार्यक्रमाचे कौतुक केले.**

हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी आनंद बडवे, सुनिता खरात,रेखा दाभोळे, मनिषा साबळे,आदि शिक्षक कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या स्नेहसंमेलनास सरपंच शैलाताई राऊत,उपसरपंच शिवाजी भोसले,केंद्र प्रमुख अंकुश शिंदे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत अवघडे, नामदेव चव्हाण, पुनम खुस्पे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शब्बीर पठाण,उपाध्यक्ष भगवान गुळिक,संजय भोसले , तसेच विद्यार्थी ,विद्यार्थिनी, ग्रामस्थ, पालक आदि मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

उपस्थित मान्यवर पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ यांचे मुख्याध्यापक हणमंतराव अवघडे यांनी आभार मानले.

# जीवनात येणाऱ्या समस्यांचे सकारात्मक आकलन करा

## ज्येष्ठ विधिज्ञ सुधाकर आव्हाड यांचे प्रतिपादन, सुचित्रा घोगरे काटकर यांच्या एक पाऊल सकारात्मकतेचे पुस्तकाचे प्रकाशन

**सातारा : प्रतिनिधी**

समाजामध्ये भयगंड आणि न्यूनगंड मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे त्यामुळे सामाजिक स्थैर्य बिघडले आहे. या विदारक परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजमन स्थिर करणे गरजेचे आहे. त्याकरिता जीवनात येणाऱ्या समस्यांचे सकारात्मक पद्धतीने आकलन केल्यास त्यावर यशस्वीपणे मात करता येते असे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुधाकर आव्हाड यांनी केले.

ॲड. सुचित्रा घोगरे काटकर यांच्या एक पाऊल सकारात्मकतेचे पुस्तक प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते संपादक स्वागत थोरात ज्येष्ठ साहित्यिक व शब्द शिवारचे प्रकाशक इंद्रजित घुले, दैनिक प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे इत्यादी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

आव्हाड पुढे म्हणाले, कोविडच्या काळामध्ये संपूर्ण मानव जातीमध्ये मरगळ आली होती आपण सर्वजण चैतन्य हरवून बसलो होतो अनामिक हूरहूर लावणारी अनिश्चितता व्यापून वरली होती मात्र अशा



परिस्थितीमध्ये काही घटना काही प्रसंग काही लेख यांनी आपल्या आयुष्यात आशेचे रंग भरले सकारात्मक पद्धतीचे सुचित्रा घोगरे यांचे लघुलेख हे अशांत मनाला नक्कीच शांत करणारे आहेत जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची क्षमता त्यांच्या लेखणीत आहे एकूण श्रमलेल्या कष्टलेल्या दमलेल्या मनाला दिलासा देणारा हा झरा आहे. समस्यांचे सकारात्मक पद्धतीने आक्रमण केल्यास नकारात्मकतेवर यशस्वीपणे मान करता येते आपण समस्यांकडे कसे पाहतो ते अत्यंत महत्त्वाचे आहे त्यासाठीच सतत माणसाने माझे काम होणार या सकारात्मक ऊर्जेने काम केले पाहिजे.

इंद्रजीत घुले म्हणाले सकारात्मकतेचे एक पाऊल ही अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट असते अनेक निराशावादी घटनांनी आयुष्याची पडझड सातत्याने होत असते सकारात्मकता घेऊन आपण उभे राहिल्यास आयुष्यात कधीच काही कमी पडत नाही सामाजिक जाणीव यांची तळमळ ही सुद्धा एक सकारात्मकताच आहे. एक सुरी चौकटीत न अडकता सुचित्रा घोगरे विविध अंगाने व्यक्त होत आहेत यालाच सकारात्मकता असे म्हणतात.

ज्येष्ठ संपादक श्रीकांत कात्रे म्हणाले, सभोवती घडणाऱ्या विविध घडामोडींच्या नकारात्मक बाजूसमोर येतात त्यासाठी समाजाला भानं देणाऱ्या सकारात्मक गोष्टी आवश्यक आहेत. त्यासाठी सतत चांगल्या घटनांची नोंद घेत आपण लिहते राहिले पाहिजे या शब्दात कात्रे यांनी घोगरे यांच्या लेखन प्रवासाला शुभेच्छा दिल्या.

ब्रेल मॅन ऑफ इंडियाचे संपादक व कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वागत थोरात म्हणाले ग्रंथ समाजाला प्रवाही बनवितात. जुन्या बखरीमध्ये मार्गदर्शक व्यक्तिमत्वांची नोंद मिळते. प्रवाहाच्या पलीकडील माणसे समाजरचनेची चौकट घडवितात सुचित्रा घोगरे यांचा क्रियाशील स्वभाव या चौकटीतला आहे. अशी सकारात्मकता भविष्यकाळातील बखरीमध्ये नोंदली जाईल असे ते म्हणाले.

'कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांचे स्वागत व दीपप्रज्वलनाने झाली. मोजक्या शब्दात लेखिका ॲड. सुचित्रा घोगरे काटकर यांनी लेखन प्रवास उलगडला. एका पाऊल सकारात्मकतेचे या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशनं करण्यात आले. डॉ. महेश शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सविता कारंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# गौतम अदानींना तिसरा मोठा झटका! ओरिएंट सिमेंटची आणखी एक मोठी डील हातातून निसटली

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

अडचणीत सापडलेल्या अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांना आणखी एक मोठा झटका बसला आहे. सीके बिर्ला समूहाची कंपनी ओरिएंट सिमेंटने अदानी पॉवर महाराष्ट्रसोबतचा कराराच रद्द करून टाकला आहे. अदानी समूह या करारासाठी आवश्यक मंजुरी मिळवण्यात अपयशी ठरला असे ओरिएंच समूहाचे म्हणणे आहे.



ओरिएंट सिमेंटने सप्टेंबर २०२१ मध्ये अदानी समूहासोबत सामंजस्य कराराची घोषणा केली होती. अदानी पॉवरने हा करार न करण्याची विनंती केली आहे, असे कंपनीने शेअर बाजाराला सांगितले आहे.

२४ जानेवारी रोजी हिंडेनबर्ग रिसर्च अहवाल समोर आल्यानंतर अदानी समूहाला हा तिसरा मोठा धक्का आहे. प्रथम, त्यांनी DB पॉवर खरेदी करण्याचा करार पूर्ण केला नाही आणि नंतर PTC India साठी बोली लावण्यापासून ते मागे हटले.

दोन्ही कंपन्यांनी महाराष्ट्रातील तिरोडा येथे सिमेंट ग्राइंडिंग युनिट स्थापन करण्यासाठी सप्टेंबर २०२१ मध्ये सामंजस्य करार केला होता. त्यासाठी ओरिएंट सिमेंटने ३५ एकर जमीनही पाहिली होती. परंतु ओरिएंट सिमेंटचे म्हणणे आहे की अदानी पॉवरला त्यांच्या प्लांटसाठी एमआयडीसीकडून आवश्यक मंजुरी मिळू शकली नाही. तसेच या सामंजस्य कराराची कालमर्यादाही निघून गेली आहे.

बुधवारी अदानी पॉवरचा समभाग पाच टक्क्यांनी घसरून १६२.४५ रुपयांवर बंद झाला, तर ओरिएंट सिमेंटचा समभाग दोन टक्क्यांनी घसरून ११७.३५ रुपयांवर बंद झाला.

हिंडेनबर्ग रिसर्चच्या अहवालाने अदानी समूह चांगलाच हादरला आहे. यामुळे गौतम अदानी यांच्या नेतृत्वाखालील समूहाचे मार्केट कॅप १४२ अब्ज डॉलरने घसरले आहे. त्यामुळेच या समूहाने आता आक्रमकपणे विस्ताराच्या योजना बॅकबर्नरवर टाकण्यास सुरुवात केली आहे. आता त्यांचे लक्ष पूर्णपणे रोख बचत आणि कर्ज कमी करण्यावर आहे. याच कारणामुळे समूहाने प्रथम DB पॉवर बरोबर करार केला नाही आणि नंतर PTC India Ltd साठी बोली न लावण्याचा निर्णय घेतला.

# एसी डबल डेकर ई-बस मुंबईकरांच्या सेवेत, तिकीट दर ते बसमार्ग, सबकुछ एका क्लिकवर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांच्या सेवेत नुकतीच इलेक्ट्रिक एसी डबल डेकर बस दाखल झाली. पहिल्या दिवसापासूनच मुंबईकरांनी बस सेवेला तुफान प्रतिसाद दिला आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर ही सेवा सुरु झाल्याने आता मुंबईकरांचा प्रवास गारेगार होणार आहे. पहिल्याच दिवशी एक हजाराहून अधिक प्रवाशांनी डबल डेकर इलेक्ट्रिक एसी बसने प्रवास केल्याची माहिती आहे. ए-११५ क्रमांकाची बस सोमवार ते शुक्रवार दररोज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नरिमन पॉईंट या मार्गावर दर अर्धा तासाच्या अंतराने धावणार आहे. तर शनिवार-रविवारी याच बसमधून हेरिटेज टूर करता येणार आहे. मार्च अखेरपर्यंत मुंबईच्या रस्त्यांवर तब्बल २०० एसी डबल डेकर ई बस रुजू करण्याची योजना असल्याचं 'बेस्ट'चे महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा यांनी सांगितलं आहे.

ही बस सध्या सीएसएमटी स्टेशन ते एनसीपीए (नॅशनल सेंटर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स) या मार्गावर चालवली जाणार आहे. सकाळी ८.४५ ते रात्री १०.२० या वेळेत ही बस धावणार आहे. ११५ क्रमांकाची ही बस असेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अर्थात सीएसएमटीहून सकाळी पावणे नऊ वाजता पहिली बस सुटणार. सध्या केवळ दोनच बस मुंबईकरांच्या सेवेत येणार असून पुढच्या आठवड्यापर्यंत आणखी सात ते आठ बस सेवेत येतील, असा अंदाज आहे.

मुंबईकरांसाठी डबल डेकर बस हे विशेष आकर्षणाचे केंद्र आहे. जुन्या साध्या डबल डेकर बस हळूहळू कालबाह्य होत असताना त्याऐवजी आता वातानुकूलित आणि त्याही इलेक्ट्रिक डबलडेकर बस सेवेत आणल्या



जात आहेत. विशेष म्हणजे खिशाला परवडणाऱ्या किमतीत प्रवाशांना इच्छित अंतर आरामदायी प्रवास करता येणार आहे

एका एसी डबल डेकर ई बसमध्ये इतर डबल डेकर प्रमाणेच ७८ जण प्रवास करु शकतात. सीसीटीव्ही कॅमेरा, चालक-वाहक यांच्यातील संपर्कासाठी विशेष व्यवस्था, दोन्ही बाजूंना स्वयंचलित दरवाजे अशी या बसची ठळक वैशिष्ट्ये आहेत. या बसला सिंगल डेकरप्रमाणे पुढे आणि मागे अशा दोन्ही बाजूंना दरवाजे असतील. सामान्यतः सध्याच्या डबल डेकर बसेसना केवळ मागच्या बाजूला एकच दरवाजा असतो.


प्रवाशांना पहिल्या पाच किलोमीटरसाठी सहा रुपये मोजावे लागणार आहेत. या आकर्षक आणि आरामदायी बसने प्रवास करण्यासाठी प्रवाशांची झुंबड उडत आहे. स्मार्ट कार्ड च्या माध्यमातून देखील तिकीट काढता येणार आहे. गेल्या वर्षी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या सेवेचे उद्घाटन करण्यात आले होते. २०२३-२४ आर्थिक वर्षात, बेस्टचा मुंबई शहरात सुमारे ४००० ई-बस सुरू करण्याचा विचार आहे.

कुलाबा डेपो, मजास डेपो आणि कुर्ला डेपोमधून या बस निघतील. ज्या मार्गांवर सध्या साध्या डबल डेकर बसेस धावतात, त्याच मार्गांवर या एसी ईबसही धावतील. जास्तीत जास्त मार्गांवर एसी डबल-डेकर ई-बस कार्यान्वित करण्यापूर्वी बेस्ट बस डेपोमध्ये चार्जिंग पॉइंट्स सुरु करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सर्व ई बसेस येईपर्यंत कुलाबा, मजास आणि कुर्ला डेपोत चार्जिंग स्टेशन्स तयार ठेवली जात आहेत. बेस्टच्या ताफ्यात मुंबईत ४१० ई बस कार्यरत असून यात बेस्टच्या प्रीमियम बसचा समावेश आहे. बीएमसीने आपल्या बजेटमध्ये संपूर्ण शहरात ३ हजार नवीन ई-बस सुरू करण्याचा उल्लेख केला आहे.

# नागराज मंजुळे करणार ऑलिंपिक पदक विजेते पैलवान खाशाब जाधव यांच्यावर सिनेमा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये कुस्ती हा क्रीडा प्रकार खूपच लोकप्रिय आहे. लाल मातीमध्ये खेळाला जाणारा अस्सल रांगडा खेळ. कुस्ती या क्रीडा प्रकारात ऑलिम्पिकमध्ये भारताला पहिलं पदक मिळवून दिलं ते पैलवान खाशाबा जाधव यांनी. आजही कुस्तीमध्ये खाशाबांचं नाव अतिशय आदारानं घेतलं जातं. अशा या लोकप्रिय व्यक्तीमत्वाच्या आयुष्यावर आधारीत बायोपिक येत आहे.



खाशाबांवर बायोपिक करण्याची घोषणा प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी केली आहे. कुस्तीचं माहेरघर असलेल्या कोल्हापूरमध्ये नागराज यांनी ही घोषणा केली आहे. नागराज यांनी ही घोषणा केल्यानंतर कुस्तीप्रेमींना आणि सिनेमारसिकांना या सिनेमाची उत्सुकता लागली आहे. खाशाबा जाधव यांनी हेलसिंकी इथं १९५२ मध्ये झालेल्या ऑलिम्पिकमध्ये भारताला कुस्ती या व्यक्तीगत क्रीडा प्रकारामध्ये पहिलं पदक मिळवून दिलं होतं.

या स्पर्धेत खाशाबा जाधव यांनी कांस्य पदक जिंकलं होतं. अशा या जागतिक दर्जाच्या पैलवानाच्या आयुष्यावर आधारीत बायोपिकची घोषणा नागराज मंजुळे यांनी केली आहे. नागराज यांनी ही घोषणा कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील उमळवाडमध्ये महाशिवरात्री यात्रे निमित्तानं भरवलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेमध्ये केली. याच कुस्तीच्या मैदानातून नागराज मंजुळे यांनी खाशाबा जाधव यांच्या आयुष्यावर आधारित सिनेमा बनवण्याची घोषणा केली.

देशासाठी पहिलं आंतरराष्ट्रीय पदक मिळवणारा लाल मातीतला अस्सल मराठमोळा माणूस म्हणजेच, खाशाबा जाधव. खाशाबांचं आयुष्य रुपेरी पडद्याच्या माध्यमातून जगासमोर यावं या उद्देशानं हा सिनेमा करत असल्याचं नागराज मंजुळे यांनी सांगितलं. मंजुळे यांनी यावेळी पुढं सांगितलं की, 'खाशाबा जाधव हे जागतिक किर्तीचे आणि दर्जाचे पैलवान होते. त्यामुळे त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. त्यामुळे त्यांच्या आयुष्यावर सिनेमा बनवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. माझ्यासाठी ही खूप आनंदाची गोष्ट आहे. लवकरच मी यासंदर्भात माहिती देईल. या सिनेमाचं शूटिंगदेखील कोल्हापुरात होऊ शकतं. या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांना तो काळ अनुभवायला मिळणार आहे.'

खाशाबा जाधव यांचा जन्म १२ जानेवारी १९२६ मध्ये झाला. खाशाबांचे वडील दादासाहेब जाधव हेदेखील त्यांच्या काळातील प्रसिद्ध पैलवान होते. दादासाहेब जाधव यांचा खाशाबा हा पाचवा मुलगा. लहान असल्यापासूनच खाशाबांना कुस्तीचं बाळकडू मिळालं होतं. खाशाबांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य कुस्तीला समर्पित केलं होतं. सन १९४८ मध्ये जेव्हा लंडन ऑलिम्पिकमधील फ्लायवेट गटासाठी खाशाबांची निवड झाली तेव्हा ते ६ व्या क्रमांकावर होते. या क्रमांकापर्यंत पोहचणारे भारत देशातील ते एकमेव खेळाडू होते.

त्यानंतर अत्यंत खडतर परिश्रम खाशाबांनी केले. त्याचं फळ म्हणून त्यांना १९५२ मध्ये हेलसिंकी इथल्या ऑलिम्पिकला जाण्याची संधी मिळाली. परंतु तिथं जाण्यासाठी पुरेसे पैसे खाशाबांकडे नव्हते. त्यावेळी खाशाबा कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात शिकत होते. त्या महाविद्यालयाचे प्राचार्य बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी आपल्या या विद्यार्थ्यासाठी स्वतःचे घर बँकेकडे गहाण ठेवत त्यांना ७ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. तसंच खाशाबांच्या गावानेही वर्गणी काढून त्यांना दिली आणि खाशाबा ऑलिम्पिकसाठी रवाना झाले.

**ऑलिम्पिकमधला पहिलं पदक**

ऑलिम्पिकमध्ये गादीवरील कुस्ती होती. तिथे खेळताना खाशाबांकडून काही चुका झाल्याने त्यांचं सुवर्णपदक थोडक्यासाठी हुकलं आणि त्यांना कान्स्य पदकावर समाधान मानावे लागले . खाशाबांना मिळालेलं हेच कान्स्य पदक स्वतंत्र भारत देशाला मिळालेले पहिलं ऑलिम्पिक पदक ठरलं. खाशाबांनी केलेल्या या कामगिरीमुळे महाराष्ट्रातील कऱ्हाडमधील गोळेश्वर हे लहानसे गाव जगाच्या नकाशावर आलं. खाशाबा पदक जिंकून जेव्हा त्यांच्या गावी परतले तेव्हा त्याचं भवदिव्य स्वागत करण्यात आलं. यावेळी त्यांच्यासाठी १५१ सजवलेल्या बैलगाड्या, ढोल तासे, लेझीम पताका, फटाके आणि हजारो लोक उपस्थित होते.

सन १९५५मध्ये खाशाबा जाधव हे महाराष्ट्र पोलीस दलात ते सब-इन्स्पेक्टर या हुद्द्यावर भरती झाले. तिथे आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी अनेक कुस्त्या जिंकल्या. त्याचवेळी ते राष्ट्रीय स्तरावर मार्गदर्शक म्हणून काम करू लागले. हे करत असतानाच त्यांनी पोलीस खात्यात २७ वर्षे नोकरी केली आणि असिस्टंट पोलीस कमिशनर या हुद्द्यावरून निवृत्त झाले. खाशाबा जाधव यांचा सन १९८४ मध्ये एका रोड अपघातात दुर्दैवी अंत झाला. भारत सरकारने खाशाबा यांना कुस्तीमधील त्यांच्या योगदानाबद्दल मरणोत्तर अर्जुन पुरस्काराने सन्मानित केलं आहे.

# चीनमध्ये कोळसा खाणीचा मोठा भाग खचला : ५७ जण बेपत्ता

## अनेक वाहने गाडली गेली, बचाव मोहीम सुरू

**बीजिंग : प्रतिनिधी**

चीनच्या इनर मंगोलियातील अल्क्सा लीगमधील कोळसा खाणीचा एक मोठा भाग बुधवारी खचला. यात अनेक वाहने आणि लोक जमिनीखाली गाडले गेले. या घटनेनंतर एकूण ५७ जण बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. चिनी वृत्तसंस्था शिन्हुआने दिलेल्या वृत्तानुसार, बुधवारी दुपारी ही घटना घडली. घटनेच्या पार्श्वभूमीवर अनेक कामगार आणि वाहने गाडल्याचे समोर येत आहे.

कोळसा खाणीतील एका कामगाराने सांगितले की, स्प्रिंग फेस्टिव्हलदरम्यानही खाण सुरू राहिली होती. ड्रोनद्वारे सध्या कोसळलेल्या भागाचा अंदाज घेतला जात आहे. कोसळण्याच्या वेळी खाणीतील कामगारांची संख्या सांगण्यास अधिकाऱ्यांनी नकार दिला. आतापर्यंत तीन जणांना बाहेर काढण्यात आले आहे, यापैकी दोघांमध्ये जिवंतपणाची लक्षणे नव्हती.स्थानिक अधिकाऱ्यांनी प्राथमिक पातळीवरील आपत्कालीन सेवा सुरू केली आहे. अनेक बचाव पथके घटनास्थळी उपस्थित आहेत.

इनर मंगोलिया हा चीनमधील कोळसा आणि इतर खनिजांच्या उत्खननासाठी महत्त्वाचा प्रदेश आहे. तथापि, या खाण प्रकल्पामुळे पर्वत, गवताळ मैदान आणि वाळवंटांचे मूळ लँडस्केप उद्ध्वस्त केल्याचे टीकाकारांचे म्हणणे आहे.

## ब्रिटनचे सुनक सरकार बीबीसीसोबत

**लंडन :** बीबीसीवर आयटी छापे आणि माहितीपटाचा मुद्दा पहिल्यांदाच ब्रिटिश संसदेत उपस्थित झाला.

BBCच्या दिल्ली आणि मुंबईतील कार्यालयांवर छापे टाकल्याचा मुद्दा आता ब्रिटिश संसदेत उपस्थित झाला आहे. ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य जिम शॅनन यांनी याप्रकरणी सरकारला जाब विचारला. यावर सुनक सरकारचे खासदार डेव्हिड रॅटले म्हणाले की, आम्ही इइउ सोबत उभे आहोत. ब्रिटिश संसद इइउला निधी देते आणि आम्ही त्यांच्या स्वातंत्र्याचा आदर करतो. ब्रिटनमध्येही इइउ ही कंझर्व्हेटिव्ह आणि लेबर या दोन्ही पक्षांचा विरोध करत आले आहे.

रॅटले म्हणाले- बीबीसीला भाषण स्वातंत्र्य आहे जे आमच्या मते खूप महत्त्वाचे आहे. आम्ही आमचे मित्र भारत सरकारलादेखील हे सांगू इच्छितो.

# कोरोनाच्या दहशतीने आई ३ वर्षे मुलासह घरातच बंद : पतीलाही नव्हती एंट्री

## अखेर पोलिसांना बोलावले, गुरुग्राममधील हादरवणारी घटना

**गुरूग्राम : प्रतिनिधी**

हरियाणाच्या गुरुग्राममधून एक भयावह कथा समोर आली आहे. कोरोनाच्या भीतीच्या छायेत एका महिलेने आपल्या ११ वर्षाच्या मुलाला सलग ३ वर्षे घरात कैद करून ठेवले आणि तिने स्वतः ही घराच्या उंबरठ्याच्या बाहेर पाऊल टाकले नाही. नवरा त्यांना आवश्यक गोष्टी पुरवत राहिला, पण महिलेने त्याला घरात येऊ दिले नाही. त्यानंतर नवऱ्याने पोलिसात तक्रार दिली. आता मुलाची सुटका करण्यात आली असून पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, गुरुग्रामच्या मारुती विहार परिसरात एका आईने आपल्या मुलाला गेल्या ३ वर्षांपासून घरात कैद करून ठेवले होते. वास्तविक, मुनमुन नावाच्या महिलेने कोरोनाच्या भीतीने गेल्या ३ वर्षांपासून आपल्या मुलाला आपल्यासोबत घरात कैद केले होते. ती स्वतः घरातून बाहेर पडत नसे आणि आपल्या मुलाला घराबाहेर पडू देत नव्हती.

११ वर्षीय निष्पाप मुलाच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार केली. पोलिस आणि आरोग्य विभागाच्या पथकाने दोघांचीही घरातून सुटका केली. महिलेचा पती या दोघांना घरी जेवण पुरवत असे आणि स्वतः भाड्याने दुसऱ्या घरात राहत असे. याप्रकरणी महिलेच्या पतीने पोलिसांत तक्रार दिली होती. नवऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, बऱ्याच दिवसांपासून तो पत्नीला समजावण्याचा प्रयत्न करत आहे, पण पत्नीला हे समजत नाहीये. कोरोनाच्या भीतीमुळे ती स्वतः घराबाहेर पडत नाही आणि आपल्या मुलालाही बाहेर पडू देत नाही.

**नवऱ्याला घरात प्रवेश नाही**

महिलेची मानसिक स्थिती इतकी बिघडली की तिने आपल्या पतीचा घरात प्रवेश बंद केला. सध्या आरोग्य विभाग आणि पोलिसांच्या पथकाने दोघांनाही घरातून बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले आहे. रुग्णालयात मानसोपचार तज्ज्ञांकडून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. हा संपूर्ण प्रकार समोर आल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला आहे. अखेर, कोरोनाच्या भीतीमुळे एका महिलेने स्वत:लाच, पण आपल्या मुलालाही घराबाहेर पडू दिले नाही.

# दिल्लीत प्रथमच 'आप'चा महापौर : शैली ओबेरॉय यांनी भाजपच्या रेखा गुप्तांचा केला पराभव

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

दिल्लीत पहिल्यांदाच आम आदमी पक्षाने महापौरपद मिळवले आहे. बुधवारी झालेल्या मतदानात 'आप'च्या शैली ओबेरॉय यांनी भाजपच्या रेखा गुप्ता यांचा पराभव केला. या निवडणुकीत एकूण २४१ नगरसेवकांनी मतदान केले. त्याचवेळी काँग्रेसच्या ९ नगरसेवकांनी निवडणुकीत सहभाग घेतला नव्हता. चट्टू निवडणुकीसाठी आज सकाळी ११.२० वाजता सिव्हील सेंटरमध्ये मतदान सुरू झाले. दोन तास मतदान प्रक्रिया पार पडली.

महापौरपदासाठी 'आप'च्या शैली ओबेरॉय आणि भाजपच्या रेखा गुप्ता यांच्यात लढत झाली. तिसऱ्या उमेदवार म्हणून



'आप'च्या आशु ठाकूरही रिंगणात होत्या. दिल्लीत एमसीडीच्या निवडणूका ४ डिसेंबरला पार पडल्या, तर त्यांचे निकाल ८ डिसेंबरला लागले होते. १५ वर्षांनंतर एमसीडीमधील भाजपची सत्ता गेली आहे.

**महापौर होण्यासाठी १३८ मतांची गरज**

आपचे १५१ नगरसेवक असून त्यापैकी १३४ निवडून आले आहेत. १३ आमदार, ३ खासदार आणि एक अपक्ष नगरसेवक पाठिंबा देत आहेत. भाजपच्या बाजूने ११२ नगरसेवक असून, त्यापैकी १०४ नगरसेवक निवडून आले आहेत. ७ खासदार आणि १ आमदार आहेत. २५० जागांच्या सभागृहात महापौरपदासाठी १३८ मतांची गरज आहे.

गोंधळाचे कारण म्हणजे एलजी व्हीके सक्सेना यांनी एमसीडीच्या १० नामनिर्देशित सदस्यांना मतदान करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला. याबाबत आपच्या महापौरपदाच्या उमेदवार शैली ओबेरॉय यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यात महापौरपदाच्या निवडणुकीत नामनिर्देशित नगरसेवकांना मतदानाचा हक्क देण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते.

१७ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने आपच्या बाजूने निकाल दिला. २४ तासांत नोटीस बजावण्यास सांगितले होते. आपचे १५१ नगरसेवक असून त्यापैकी १३४ निवडून आले. १३ आमदार, ३ खासदार आणि अपक्ष नगरसेवकांचा पाठिंबा आहे. तर भाजपकडे ११२ नगरसेवक असून त्यात १०४ निवडून आलेले नगरसेवक, ७ खासदार आणि १ आमदार यांचा समावेश आहे. २४ जानेवारी आणि ६ फेब्रुवारी रोजी, आप आणि भाजपच्या सदस्यांनी चट्टू मुख्यालयात गोंधळ घातला. त्यामुळे निवडणूक होऊ शकली नाही.

# रशिया २०३० पर्यंत बेलारूसवर मिळवणार कब्जा : लीक झालेल्या कागदपत्रांमध्ये खुलासा

**कीव्ह : वृत्तसंस्था**

युक्रेनच्या सर्वात मोठ्या वृत्तपत्र 'कीव इंडिपेंडंट'ने काही लीक झालेल्या कागदपत्रांच्या आधारे मोठा दावा केला आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनवर हल्ला करणाऱ्या रशियाला २०३० पर्यंत शेजारील आणि मित्र देश बेलारूसचा ताबा घ्यायचा असल्याचे त्यात म्हटले आहे. या दस्तऐवजाचे दोन भाग आहेत.

वृत्तानुसार, एकीकडे व्लादिमीर पुतिन यांचे सरकार युक्रेनवर कब्जा करण्याचा प्रयत्न करत आहे. तर दुसरीकडे बेलारूसबद्दलही त्यांचे हेतू चांगले नाहीत. बेलारूसचे सरकार आणि त्याचे अध्यक्ष अलेक्झांडर लुकाशेन्को युक्रेनविरुद्धच्या युद्धात पुतीन यांना शक्य तितक्या सर्व प्रकारे मदत करत आहेत. असे असताना ही परिस्थिती आहे. बेलारूसचे अध्यक्ष लुकाशेन्को यांच्यासोबत पुतिन रशियन लढाऊ विमाने आपल्या देशात बनवण्यास तयार असल्याचे लुकाशेन्को यांनी म्हटले आहे.

१७ पानांचा दस्तऐवज अमेरिका, युरोप आणि कीव इंडिपेंडंटच्या पत्रकार गटाच्या हाती लागले आहे. त्यात कथितपणे बेलारूसवर कब्जा करण्यासाठी रशियाने केलेल्या योजनेचा तपशील आहे. या दस्तऐवजात बेलारूसचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा कट आहे. मित्र राष्ट्र बेलारूसच्या राजकीय, आर्थिक आणि सैन्यावर वर्चस्व मिळविण्याचा रशियाच्या प्रयत्नाचे यात तपशीलवार वर्णन केले आहे. ७ वर्षांत म्हणजे २०३० पर्यंत बेलारूसवर पूर्णपणे ताबा मिळवण्याचा त्याचा मानस आहे.

दस्तऐवजात असे म्हटले आहे की, २०३० पर्यंत बेलारूसमध्ये रशियात असलेले चलन आणि कर प्रणाली आणायची आणि माध्यमांवरही नियंत्रण मिळवायचे आहे. याशिवाय, रशियाप्रमाणेच नियम बेलारूसच्या सैन्यालाही पाळावे लागतील. एवढेच नाही तर बेलारूसचे सर्व मोठे लष्करी आस्थापना रशियाकडे हलवण्यात येणार आहेत.

युक्रेन युद्धात मदत केल्याबद्दल बेलारूससारख्या उपयुक्त देशांचे आभारी असल्याचे पुतीन यांनी नुकतेच म्हटले होते. पुतिन यांच्या मते, लुकाशेन्को यांनी आपले वचन पाळले आहे.

खुद्द युक्रेन वृत्तपत्राने हे लीक झालेले दस्तऐवज प्रकाशित केलेले नाही. पाश्चात्य गुप्तचर सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक रशियन एजन्सींनी संयुक्तपणे ही दोन भागांची योजना तयार केली आहे. पहिला भाग - २०२२ ते २०२५ पर्यंत चालेल. दुसरा आणि शेवटचा भाग - २०२५ ते २०३० या कालावधीत लागू केला जाईल.